**२५ ऑक्टोबर २०१६**

प्रसिद्धी पत्रक

# मतदारांचे मतदानपूर्व आणि संपूर्णपणे अराजकीय सर्वेक्षण

एकूण ३६ पैकी ३३ जिल्ह्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांच्या निमित्ताने सगळा महाराष्ट्र पुन्हा एकदा निवडणूकमय झालेला आहे. येत्या २४ ऑक्टोबरपासून नगर परिषद आणि नगर पंचायतींमध्ये इच्छुक उमेदवार आपापले अर्ज भरायला सुरूवात करतील. प्रत्यक्ष निवडणुका मात्र २७ नोव्हेंबर २०१६ ते ८ जानेवारी २०१७ यादरम्यान चार टप्प्यांमध्ये होईल. राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे यांनी मतदानाआधी कल जाणून घेण्यासाठी १८ नगर परिषद आणि नगर पंचायतींमधील मतदारांचे सर्वेक्षण केले यांचे निष्कर्ष मतदारांच्या भावना आणि उमेदवारांकडून त्यांना असलेल्या अपेक्षा यांवर प्रकाश टाकणारे आहेत.

असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर) आणि महाराष्ट्र इलेक्शन वॉच (एमइडब्ल्यू) मतदारांना जास्तीत जास्त अभ्यासपूर्ण निर्णय घेता यावा याकरिता महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग आणि गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स (पुणे) यांना मतदारांच्या मतदानपूर्व सर्वेक्षणाचा अहवाल प्रसारित करण्यामध्ये सहकार्य करताहेत. या अहवालात ऑक्टोबर २०१६ या महिन्यात तब्बल ५१०० मतदारांचे विचार जाणून घेण्यात आले आहेत. हे मतदार बहुतेक करून निम्न--नागरी भागातील रहिवासी होते.

यंदाच्या निवडणुकांतून मतदारांना तरुणाई कडूनच जास्त अपेक्षा असल्याचे दिसून येते आहे. ८४ टक्के मतदारांना त्यांचा उमेदवार चाळिशीपेक्षा कमी वयाचा हवा आहे. विशेष करून तरूणांचा स्पष्टच आग्रह आहे, की त्यांचे प्रतिनिधित्व तरूण उमेदवारानेच करावे. निवडणुकीत भाग घेणा-या उमेदवारांपैकी बहुतेक तर दहावी सुद्धा पास झालेले नाहीत याबद्दल ७८ टक्के मतदारांनी खंत व्यक्त केली आहे. तब्बल ९२ टक्के मतदारांना त्यांचे प्रतिनिधित्व करणारा उमेदवार हा किमान पदवीधारक हवा आहे. यावरून हे स्पष्ट आहे, की मतदारांना त्यांचा उमेदवार तरूण आणि उच्चशिक्षितच हवा आहे.

अजून काही निष्कर्ष निराशादायी आहेत. ८४ टक्के मतदारांना असे वाटते, की निवडणुकीत भाग घेणा-या उमेदवारांपैकी बहुतेकांना समाज बांधणी, जनसंपर्क इत्यादीचा काहीही अनुभव नसतो जो स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विकास कामांसाठी अतिशय आवश्यक असतो. ८६ टक्के मतदारांचे असे म्हणणे आहे, की उमेदवार केवळ यासाठी निवडणूक लढवतात, की ते प्रभावी राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबांतले असतात. ८३ टक्के मतदारांना त्यांच्या मतदारसंघातील निवडणुकांमध्ये असे उमेदवार पाहिजेत ज्यांना विकासकामांचा अनुभव असेल.

उमेदवार भ्रष्ट आहेत का? तर ८० टक्के मतदारांना हो, आहेत असं वाटतं. ८५ टक्के मतदारांच्या निरीक्षणानुसार श्रीमंत उमेदवार निवडणुकीत उतरतात आणि सगळं काही विकत घेतात. ८६ टक्के मतदारांचा म्हणणं आहे, विकासकामांबद्दल उमेदवारांची कार्यक्षमता ही स्वच्छ चारित्र्यापेक्षा जास्त महत्वाची आहे.

८९ टक्के मतदारांना असं वाटतंय, की अर्ध्या जागा महिलांसाठी राखीव ठेवणं ही चांगली कल्पना आहे पण ८९ टक्के उमेदवारांना असंही वाटतं, की महिला उमेदवार ह्या त्यांच्या कुटुंबातील प्रभावी, पुरूष उमेदवाराच्या हातातल्या कळसुत्री बाहुल्या असतात. ७४ टक्के लोकांना वाटतंय, की महिला उमेदवार पुरुषांपेक्षा कमी भ्रष्ट असण्याची शक्यता असते. पण उत्साहाची बाब ही आहे, की ७४ टक्के मतदारांच्या म्हणण्यानुसार गेल्या काही वर्षांमध्ये निवडणुकांमधून महिलांचा सक्रीय आणि आक्रमक सहभाग वाढला आहे.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा ९१% मतदारांसाठी चिंतेचा विषय आहे; त्यांच्यानुसार, राजकारणातील गुन्हेगारीमुळेच '**चांगले**' उमेदवार निवडणुकीच्या प्रक्रियेपासून लांब राहत असल्याची भावना सार्वत्रिक होत आहे. विशेष म्हणजे ९४ टक्के उमेदवारांना निवडणूक अधिका-यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकारणातील गुन्हेगारी घटकाला दूर सारण्यासाठी काहीतरी प्रयत्न केले पाहिजेत असे वाटते.

जास्तीत जास्त मतदारांना त्यांच्या उमेदवारामध्ये हवे असलेले पहिले तीन गुण म्हणजे - मतदारांसाठी उमेदवाराची उपलब्धता, उमेदवाराचे शिक्षण आणि मतदारसंघामधील प्रश्नांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठकांमध्ये मांडण्याची त्याची कुवत व कौशल्य.

ब-याच मतदारांना वाटतंय, की स्थानिक स्वराज्य संस्थां पातळीवरील निवडणुकांना विश्लेषणासाठी लोकसभेइतकं महत्व दिलं जात नाही. ९३.५ टक्के मतदारांना त्यांच्या मतदारसंघातून निवडणून लढवणा-या उमेदवारांबद्दल जास्त जाणून घ्यायचं आहे. अर्थात् मतदारांना येत्या निवडणुकीत उमेदवारांबद्दल जास्तीत जास्त अभ्यासपूर्ण पद्धतीने निर्णय घ्यायचा आहे.

धन्यवाद.

# संपर्क

## गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे

| | |
|---|---|
| मानसी फडके<br>+९१-९८५०१ ९९६७०<br>manasi.phadke@gmail.com | राजस परचुरे<br>+९१-९८२२२ ३९६४४<br>rajasparchure@gmail.com |

## महाराष्ट्र इलेक्शन वॉच

| | | |
|---|---|---|
| अजित रानाडे<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल इलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स.<br>+९१-९७०२२ १५३१२<br>ajit.ranade@gmail.com | शरद कुमार<br>राज्य समन्वयक<br>महाराष्ट्र इलेक्शन वॉच<br>+९१-९८६९४ ०३७२१<br>sharadkumar40@gmail.com | दीपक नेगी<br>वरिष्ठ कार्यकारी सहाय्यक<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१-९८९२४ ०३१८६<br>deepak@adrindia.org |

## नॅशनल इलेक्शन वॉच/असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स

| | | | |
|---|---|---|---|
| मिडीया आणि पत्रकारांसाठी हेल्पलाईन<br>+९१ ८०१०३ ९४२४८<br>ईमेल:adr@adrindia.org | मे.जन.अनिल वर्मा (सेवानिवृत्त)<br>**प्रमुख**<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>०११ ४१६५ ४२००<br>+९१ ८८२६४ ७९९१०<br>adr@adrIndia.org, anilverma@adrindia.org | प्रा. जगदीप चोक्कर<br>आयआयएम अहमदाबाद (सेवानिवृत्त)<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९९९९६ २०९४४<br>jchhokar@gmail.com | प्रा. त्रिलोचन शास्त्री<br>आयआयएम बँगलोर<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९४४८३ ५३२८५<br>trilochans@iimb.ernet.in |